| MHSN060021032022 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज : ९३/२०२२**<br>सौ. अलका बाळासाहेब कदम /<br>श्री. बाळासो लक्ष्मण कदम वगैरे ३ |
|---|---|

**निशाणी ५ खालील आदेश**

१. अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम २३ नुसार अंतरिम आदेश पारित करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराने उदरनिर्वाहाकरीता दरमहा रु.१५,०००/– इतकी अंतरीम पोटगी, संरक्षणात्मक आदेश तसेच मूळ अर्जाचे अंतिम निर्णयापर्यंत जाबदार यांनी त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची विल्हे विक्री व तबदिली करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई मिळणेकामी विनंती केली आहे.

२. अर्जदारच्या कथनांनुसार तिचा विवाह जाबदार क्र.१ यांचेसोबत दि. १७/०५/१९९० रोजी मु.पो. सलगरे, ता. मिरज, जि. सांगली येथे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजानुसार संपन्न झाला. लग्नानंतर अर्जदार ही जाबदार हे भारतीय सैन्यामध्ये नोकरीस असल्यामुळे त्यांचे नोकरीच्या ठिकाणी गुजरात येथे नांदणेस गेली. त्यानंतर काही दिवस जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिला व्यवस्थित नांदविले व परत आपल्या घरी भोसे, ता. मिरज येथे आणून सोडले. त्यानंतर या ना त्या कारणावरुन जाबदार व त्याचे कुटुंबियांनी अर्जदारास शारिरीक व मानसिक त्रास देणे, तसेच तिला धमकावून शिवीगाळ व मारहाण करणे, तसेच "लग्नात योग्य तो मानपान केला नाही व हुंडा दिला नाही म्हणून आम्ही तुला भिका–यासारखे वागवणार" असे टोमणे मारुन तिला घालून पाडून बोलणे असे प्रकार सुरु करुन तिचा छळ करण्यास सुरुवात केली. तसेच जाबदार यांनी अर्जदार हिला घर बांधणेकरिता, म्हैस व मोटारसायकल घेणेकरिता माहेरहून पैसे घेऊन आणण्याकरिता तगादा लावून तिचा आर्थिक छळ केला. त्यानंतर सन १९९८ मध्ये जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना घरातून हाकलून दिले. अशाप्रकारे कोणतेही संयुक्तिक कारण नसताना जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिचा त्याग केलेला आहे. तेव्हापासून अर्जदार ही तिचे माहेरी अश्रीताचे जीवन जगत आहे. अर्जदार हिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार यांनी जाबदार यांना व्यवस्थित नांदविणेकरिता वारंवार सांगून देखील जाबदार यांनी तिचे काहीही ऐकले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदार हिने

जाबदार यांचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम १२५ प्रमाणे फौ.कि.अर्ज क्र.१९६/१९९९ चा पोटगी मिळणेकरीता अर्ज दाखल केला. त्यावरती मे. न्यायालयाने अर्जदार हिला दरमहा र.रु.३००/– इतकी पोटगी देणेबाबत आदेश केलेला असताना देखील जाबदार यांनी अर्जदार यांना पोटगीची कोणतीही रक्कम दिलेली नाही अथवा अर्जदाराची कोणतीही चौकशी केलेली नाही. जाबदार क्र.१ यांची अर्जदार यांना सांभाळण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असताना देखील त्यांनी आपली जबाबदारी पार पाडण्यास कसून केलेली आहे. जाबदार क्र.१ यांनी दुसरा विवाह केला असून अर्जदार यांच्या पोटापाण्याची, कपडेलत्याची व औषधोपचाराची कोणतीही व्यवस्था केलेली नसल्यामुळे अर्जदार हिला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

३. प्रस्तुत अर्जास जाबदार क्र.१ तसेच ३ व ४ यांनी नि.१६ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या कथनानुसार, अर्जदार ही सन १९९५ पासून तिचे माहेरी राहत आहे. तेव्हापासून आजतागायत अर्जदार ही जाबदार क्र.१ कडे नांदवून घ्यावे म्हणून कधीही आली नाही. जाबदार क्र.१ यांनी मध्यस्थी व नातेवाईकांमार्फत अर्जदार हिला नांदणेसाठी आणण्याकरिता बरेच प्रयत्न करुन सुध्दा अर्जदार हिने नांदण्यास स्पष्टपणे नकार दिला. अशाप्रकारे अर्जदार हिने जाबदार क्र.१ यांचा त्याग करुन त्यांना संसार सुखापासून वंचित ठेवले आहे. याउलट, अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचे बरोबर तिला नोकरीच्या ठिकाणी घेऊन जाणेकरिता भांडणतंटा करीत होती. तसेच अर्जदार हिने जाबदार क्र.१ नोकरी करीत असलेल्या ठिकाणी त्यांचे विरुध्द खोटे नाटे आरोप करुन तक्रारी अर्ज पाठविल्यामुळे जाबदार क्र.१ यांची जवळजवळ १० वर्षे नोकरी कमी झाली. त्यामुळे नोकरीनंतरचे फायदे जाबदार क्र.१ मिळाले नाहीत व त्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले. जाबदार क्र.१ यांनी कधीही दुसरे लग्न केलेले नाही. जाबदार क्र.१ व २ हे दोघे लव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत असून त्यांचा विवाह झालेला नाही. तसेच सदर संबंधातून त्यांना दोन मुले सुध्दा आहेत. जाबदार क्र.१ यांना मिळणारी पेन्शन तुटपुंजी असून त्यामधून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे त्यांना कठीण झाले आहे. तसेच जाबदार यांची जी कोरडवाहू शेती आहे त्या शेतीचा खर्च वजा जात नसल्यामुळे सदर शेतीवर काढलेल्या कर्जाची परतफेड करणे सुध्दा जाबदार यांना अवघड झालेले आहे. अशाप्रकारे जाबदार यांना आर्थिक व मानसिक त्रास देणेचे हेतूने अर्जदार हिने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला असून तो खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती जाबदार

यांनी केली आहे.

**४.** अर्जदाराचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अर्जाचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्यांसोबत मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी... |
| २. | अर्जदार हिच्या विनंतीमध्ये मागणी केल्याप्रमाणे इतर अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी... |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ व २ बाबत –**

**५.** सदर प्रकरण अर्जदारने जाबदार विरुद्ध कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२,१८,१९,२०,२१ व २२ प्रमाणे दाखल केलेले असून त्यामध्ये निशाणी ५ नुसार अंतरीम पोटगी मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

**६.** मुख्य अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने तिच्या अंतरिम पोटगीच्या अर्जामध्ये तिच्यासाठी पोटगी, संरक्षणात्मक आदेश तसेच तुर्तातुर्त मनाई मिळण्याची विनंती केलेली आहे. प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा कायदा सामाजिक स्वरुपाचा कायदा आहे. याचा उद्देश महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण व्हावे तसेच तिला पोटगीची तसेच रहाण्याची व इतर आवश्यक गरजांची पुर्तता असा विस्तृत स्वरुपाचा आहे.

**७.** अर्जदारच्या कथनानुसार लग्नानंतर जाबदार व त्याच्या कुटुंबियांनी तिचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केला. तसेच तिला शिवीगाळ व मारहाण करुन धमकाविले व नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार ही माहेरी

तिच्या आईकडे राहत आहे. याउलट तिच्या म्हणण्यानुसार जाबदार क्र.१ हे भारतीय सैन्यामधून सेवानिवृत्त झालेले असून त्यांना दरमहा र.रु.२५,०००/– इतकी पेन्शन मिळते. तसेच जाबदार क्र.१ हे सध्या सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक लि., सांगली या बँकेमध्ये सिक्युरिटी गार्ड (गनमॅन) म्हणून काम करीत असून त्यांना दरमहा र.रु.२०,०००/– इतका पगार मिळतो. तसेच मौजे भोसे येथे जाबदारांचे घर असून त्याठिकाणी त्यांची दीड एकर बागायत शेती आहे. त्यापासून त्यांना वर्षाकाठी २ ते ३ लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदार यांचे घरी दुभती जनावरे असून त्यापासून त्यांना दरमहा र.रु.१०,०००/– इतके उत्पन्न मिळते.

८. जाबदार यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार ही कोणतेही कारण नसताना जाबदार यांचा त्याग करुन स्वतःहून माहेरी निघून गेलेली आहे व तेव्हापासून अर्जदार व जाबदार यांचे पती–पत्नीचे संबंध संपुष्टात आले आहेत. तसेच अर्जदार हिने जाबदार क्र.१ यांचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम १२५ प्रमाणे फौ.कि.अर्ज क्र.१९६/१९९९ चा पोटगी मिळणेकरीता अर्ज दाखल असून त्यामध्ये तिला दरमहा र.रु.३००/– इतकी पोटगी मे. न्यायालयाने मंजूर केलेली आहे. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ नुसार अंतरीम आदेश मागणेचा अधिकार अर्जदारास नाही. तसेच जाबदार यास पेन्शनपासून मिळणारे उत्पन्न हे तुटपुंजे असून अर्जदार हिला उचलून पोटगी देणेची त्याची ऐपत नाही. याउट, अर्जदार हिची माहेरची वडीलार्जित मौजे सलगरे येथे शेतजमीन मिळकत असून त्यापासून तिला वार्षिक ३ ते ४ लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार ही दुस–यांचे शेतामध्ये मजुरीचे काम करते व त्यापासून तिला दररोज र.रु.५००/– इतके वेतन मिळते. त्यामुळे अर्जदार ही आर्थिकदृष्टया कोणावरही अवलंबून नाही. त्यामुळे अर्जदार हिला दरम्यानची पोटगी मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज व इतर मागण्या फेटाळाव्यात अशी त्यांनी विनंती केली.

९. अर्जदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, लग्नानंतर जाबदार यांनी वारंवार अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार व अत्याचार करुन तिला मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास दिला. तसेच सन १९९८ अर्जदार हिला घरातून हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी आईकडे राहत असून जाबदार क्र.१ यांनी तिची कोणतीही विचारपूस अगर कायदेशीर जबाबदारी पार पाडलेली नाही. अर्जदाराचे वडील

मयत झालेले असून तिची आई वयोवृध्द आहे. तसेच अर्जदाराचे शिक्षण अत्यंत कमी असल्यामुळे तिचे हाती कोणताही कामधंदा नाही. त्यामुळे ती तिचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे. याउलट, जाबदार क्र.१ यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली असून ते चैनीचे जीवन जगत आहेत. त्यामुळे तो अर्जदार हिला पोटगी देण्यास समर्थ आहे. त्यामुळे अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

**१०.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार व जाबदार दोघांना त्यांचा झालेला विवाह मान्य व कबूल आहे व त्यानंतर ते काही दिवस सोबत होते ही बाब देखील मान्य आहे. त्यामुळे अर्जदार हिचे जाबदार यांचेसोबत कौटुंबिक संबंध होते ही बाब प्रथमदर्शनी दिसून येते.

**११.** वर उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदार हिने जाबदार यांनी तिचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे कथन केले आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये जाबदार यांनी तिचा मानसिक, शारिरीक व आर्थिक छळ केल्याचे म्हटले आहे. सदरहू बाब ही या संपूर्ण पुराव्यानिशी सिध्द होणार आहे. तसेच, अर्जदार हिने सन १९९८ मध्ये तिला जाबदारांनी घरातून हाकलून दिल्याचे व तेव्हापासून ती तिच्या माहेरी राहत असल्याचे कथन केले आहे. तेव्हापासून जाबदार क्र.१ याने तिच्या पोटापाण्याची, कपडेलत्ता, औषधोपचार तसेच इतर दैनंदिन गरजांची कोणतीही आर्थिक व्यवस्था केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यावरुन प्रथमदर्शनी अर्जदार हिचेवर आर्थिक हिंसाचार झाला ही बाब स्पष्ट होते. अर्जदार हिने तिच्या अंतरीम पोटगीच्या अर्जामध्ये तिचेसाठी पोटगी मागितलेली आहे. त्यामुळे याक्षणी अर्जदार हिस अंतरीम पोटगी देणेबाबत विचार करता येईल.

**१२.** अर्जदार हिने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे दरमहा र.रु. १५,०००/- पोटगी मिळणेची मागणी केलेली आहे. अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहते ही बाब अभिलेखावर आलेली आहे. जाबदार क्र.१ यांची मौजे भोसे, ता. मिरज येथे गट नं. १५८ ही शेतमिळकत आहे हे अर्जदार हिने नि.३/७ कडे हजर केलेल्या ७/१२ उता-यावरून स्पष्ट होते. परंतु अर्जदारातर्फे जाबदार क्र.१ यास दरमहा र.रु.२५,०००/- इतकी पेन्शन मिळत असल्याबाबत तसेच सध्या त्याला सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक लि., सांगली येथे सिक्युरिटी गार्ड (गणमॅन) म्हणून दरमहा र.रु.२०,०००/- इतका पगार मिळत असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मे. न्यायालयासमोर हजर करणेत आलेला नाही. त्यामुळे सकृतदर्शनी जाबदार यास दरमहा र.रु.२५,०००/- इतकी

पेन्शन तसेच गणमॅन म्हणून दरमहा र.रु.२०,०००/– मिळत असल्याचे ग्राहय धरता येणार नाही. परंतु, जाबदार क्र.१ याने स्वतःहून तो भारतीय सैन्यदलात नोकरीस होता व सध्या त्याला पेन्शन मिळते ही बाब नाकारलेली नाही. इतकेच नव्हे तर शेतमिळकतीबाबत अर्जदारने केलेले कथन देखील तो अमान्य करत नाही. यावरून जाबदार नं. १ हा आर्थिकदृष्टया सक्षम असल्याचे सकृतदर्शनी दिसते. तसेच अर्जदार यांनी जाबदार यांचे विरुध्द पोटगीकरिता दाखल केलेला किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१९६/१९९९ हा दि. १६/०४/२००३ रोजी मे. न्यायालयाने मंजूर करुन अर्जदार हिला दरमहा र.रु.३००/– प्रमाणे पोटगी मंजूर केल्याचे दिसून येते. परंतु त्यानंतरही जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिला पोटगीची रक्कम दिलेली नसल्याचे अर्जदार हिने शपथेवर सांगितले असल्यामुळे सकृतदर्शनी जाबदार क्र.१ हा अर्जदार हिचेवर आर्थिक हिंसाचार करीत आहे असे दिसते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार पिडीत/बाधीत व्यक्ती ही हिंसाचार करणारे व्यक्तीशी कौटुंबिक नातेसंबंधात असणे जरुरीचे आहे. जाबदार क्र.१ याने प्रस्तुत अर्जास दाखल केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये जाबदार क्र.२ ही त्याची दुसरी पत्नी असल्याची बाब नाकारली आहे. त्यामुळे अर्जदार हीच जाबदार क्र.१ याची कायदेशीर पत्नी असल्याचे व त्यांचेमध्ये अद्याप घटस्फोट झाला नसल्याची बाब प्रकर्षाने समोर येते. अर्जदार हिची पत्नी या नात्याने पालनपोषण करण्याची सर्वस्वी जबाबदारी जाबदार क्र.१ याचीच आहे. असे असतानाही जाबदार क्र.१ याने त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी न पाळता व अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय न करता तिची जबाबदारी टाळून तिचेवर मानसिक, आर्थिक व शारीरीक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे जाबदार नं. १ याचे नावे असलेली शेतजमीन व नोकरीच्या उत्पन्नाचा विचार करता तो अर्जदार हिला अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी देण्यास पात्र ठरतो.

**१३.** जाबदार क्र.१ याच्या कथनानुसार अर्जदार हिची माहेरची वडीलार्जित मौजे सलगरे येथे शेतजमीन मिळकत असून त्यापासून तिला वार्षिक ३ ते ४ लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच अर्जदार ही दुस–यांचे शेतामध्ये मजुरीचे काम करते व त्यापासून तिला दररोज र.रु.५००/– इतके वेतन मिळते. त्यामुळे अर्जदार हिला दरम्यानची पोटगी मागण्याचा कायदेशीर अधिकार नाही. त्यासंदर्भात जाबदार क्र.१ यांनी २० कडे मौजे सलगरे येथील अर्जदार हिचे नाव नमूद असलेले ७/१२ उतारे दाखल केले आहेत. परंतु, जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिच्या नावे असलेल्या सर्व जमिनी या तिच्या

वाडवडीलार्जित मिळकती आहेत हे अप्रत्यक्षपणे कबूल केले आहे. परंतु, केवळ वडीलार्जित शेतजमिनीच्या ७/१२ उता–यामध्ये अर्जदार हिचे नाव नमूद असल्यामुळे त्यापासून तिला उत्पन्न मिळते ही बाब संपूर्ण पुरावा आल्याशिवाय सिध्द होणार नाही. तसेच अर्जदार ही दुस–यांचे शेतामध्ये मजुरीचे काम करते व त्यापासून तिला निश्चित किती उत्पन्न मिळते यासंदर्भात जाबदार याने कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा आज रोजी मे. न्यायालयासमोर हजर केलेला नाही. तसेच अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहत असल्याचे व आज रोजी तिच्याकडे कुठलेही उत्पन्नाचे साधन नसल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे. त्यामुळे अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करणेस सक्षम नाही ही बाब याक्षणी मान्य करावयास काहीही हरकत नाही. त्यामुळे अर्जदार हिला अंतरीम पोटगीची आवश्यकता आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे. कोणतीही भारतीय स्त्री आपले वैवाहिक जीवन खराब व्हावे या हेतूने कधीही केवळ आपल्या पतीकडून पोटगी मिळावी म्हणून त्याचे घर सोडून न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार नाही.

**१४.** जाबदार यांची अर्जदार हिला सांभाळण्याची कायदेशीर तसेच नैतिक व सामाजिक जबाबदारी आहे. जाबदारांनी अर्जदाराच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केल्याचे आज रोजी दिसून येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी जाबदारांनी अर्जदारांच्या आर्थिक हिंसाचार केल्याचे दिसून येते. अर्जदाराचे कथन व वकीलांचा युक्तीवाद लक्षात घेवून तसेच अर्जदाराचा राहणीमानाचा स्तर, यावरुन अर्जदार हिला महिन्याकाठी उदरनिर्वाहाकरीता र.रु.३,०००/– पोटगी देणे योग्य होईल.

**१५.** अर्जदार हिने जाबदार यांनी मूळ अर्जाचे अंतिम निर्णयापर्यंत त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची विल्हे–विक्री करु नये याबाबत तुर्तातुर्त मनाई मागितलेली आहे. परंतु, अर्जदार हिने मौजे भोसे येथे जाबदारांचे घर असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा आज रोजी न्यायालयासमोर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार हिने जाबदार क्र.१ यांच्या मौजे भोसे येथील शेतमिळकतीचा ७/१२ उतारा जरी प्रकरणात दाखल केला असला तरी जाबदार हे त्यांच्या मालकीच्या स्थावर व जंगम मालमत्तेची विल्हे–विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत हे केवळ शपथेवर सांगणे पुरेसे नाही. त्याकरीता आवश्यक तो पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार आज रोजी न्यायालयासमक्ष आणलेला नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत

जाबदार यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम देता येणार नाही.

**१६.** तसेच अर्जदार हिने जाबदार यांनी तिचेवर कोणत्याही प्रकारचे कौटुंबिक हिंसाचार करु नयेत याकरिता त्यांचे विरुध्द संरक्षणात्मक आदेश मागितला आहे. परंतु जाबदार यांनी अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास दिला किंवा नाही ही बाब संपूर्ण संपरिक्षा चालल्याशिवाय सिध्द होणार नाही. त्यामुळे त्याबाबतचा कोणताही आदेश देणे याक्षणी योग्य होणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिला दरमहा र.रु.३,०००/- (तीन हजार रुपये) अंतरिम पोटगी मूळ अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक १७/१०/२०२२ पासून पुढील आदेशापर्यंत द्यावी.

३. अर्जदार हिची तुर्तातुर्त मनाई तसेच संरक्षणात्मक आदेश मिळणेची मागणी नाकारणेत येते.

४. अर्जाचा खर्च रु.१,०००/- (एक हजार रुपये) जाबदार क्र.१ यांनी अर्जदारास द्यावा.

५. आदेशाची प्रत अर्जदाराला विनामुल्य देण्यात यावी.

Sd/---

मिरज.

**(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : १८/०१/२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मिरज

न्यायालय क्र.४

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou. A.C. Patil, (Grade-III) |
| Court | : | 4th Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj |
| Date | : | 18/01/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 18/01/2024 |
| Order uploaded on | : | 18/01/2024 |